Marathi translation of the article "Philosophy via Facebook? Why not?" By ERIC SCHWITZGEBEL PUBLISHED IN LATIMES 19TH JULY 2015, published in daily Loksatta, Bookmark, dated 08/08/2015 page 6. Translator: SHRINIWAS HEMADE, shriniwas.sh@gmail.com

---

# तत्त्वज्ञानातील जागल्या...

श्रीनिवास हेमाडे

***फेसबुक आणि ब्लॉगच्या जमान्यात तत्त्वज्ञानाची चर्चा केवळ पुस्तकांपुरती किंवा विद्यापीठीय चर्चासत्रांपुरती मर्यादित राहू नये, असे मानणारा एक चळवळ्या प्राध्यापक, पुस्तकांच्या मानीव वर्चस्वामुळे तत्त्वज्ञान क्षेत्राचे काय नुकसान झाले, याबद्दलही बोलतो आहे आणि ही चर्चा पुस्तकांच्या बाहेरही झाली पाहिजे.. ती लोकाभिमुख झाली पाहिजे, असे सांगतो आहे..***

युरोपीय-पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या विचारविश्वात प्रचंड उलाढाली नेहमीच चालू असतात. तत्त्ववेत्ते आणि तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक समाजातील प्रत्येक समस्या आपली मानतात. समस्यांवरील तत्त्वचिंतनाला केवळ वर्ग, चर्चासत्रे, परिसंवाद, नियतकालिके, विद्वतजड प्रकाशने इत्यादीच्या सोन्याच्या पिंजऱ्यात बंदिस्त करून अल्पसंतुष्ट अन् आत्ममग्न न राहाता समाजमाध्यमाच्या चव्हाट्यावर समस्यांची तड लावू पाहतात. रिचर्ड ड्वारकीन्स, नोम चोम्स्की, सायमन ब्लॅकबर्न, 'नॉब इफेक्ट' वाला जोशुवा नॉबसारखे तत्त्ववेत्ते, तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक आणि तत्त्वज्ञानाची चाह असलेले लाखो तत्त्वज्ञानप्रेमी कोणत्याही माध्यमातून व्यक्त होण्यात अवमान नाही तर सन्मान समजतात.फेसबुक, ट्विटर, ब्लॉग्ज, व्हाट'स अप, संकेतस्थळे यांचा संपूर्ण क्षमतेने ते वापर करतात.भारतातील तत्त्वचिंतन सामान्य लोकांपर्यंत नेऊन प्रवाही ठेवावयाचे असेल तर 'ठेविले अनंते....' च्या स्थितीजड सोन्याच्या पिंजऱ्यातून ते मुक्त होणे, गरजचे आहे. यासंदर्भात अमेरिकेतली विद्यमान चळवळे तत्त्ववेत्ते एरिक श्वाइत्झगेबेल  यांचे हे चिंतन....

एरिक श्वाइत्झगेबेल  हे अमेरिकेतली कॅलिफोर्निया विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असून त्यांनी दोन प्रकारच्या समस्यांची चर्चा केली. मानसशास्त्राचे तत्त्वज्ञान, तत्त्वज्ञानाचे मानसशास्त्र, मनाचे तत्त्वज्ञान, विज्ञानाचे तत्त्वज्ञान संवेदनात्मक आणि बोधात्मक मानसशास्त्र, मानवी जाणिवेचे स्वरूप इत्यादी तांत्रिक समस्या त्यांनी हाताळल्याच, पण मान्यताप्राप्त तत्त्ववेत्ते आणि तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांचे खासगी जीवनातील आणि सार्वजनिक जीवनातील नैतिक वर्तन, त्यांचे दंभ, अहंकार आणि त्यांचे लालसी राजकारण या उग्र समस्यांची चर्चा रास्तपणे तात्त्विक चिंतनाच्या ऐरणीवर आणली. हे नाजूक काम करणारे ते पहिले तत्त्ववेत्ते आहेत.



Eric Schwitzgebel

तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांचे नैतिक वर्तन खरेच नैतिक असते काय?, (सामान्य पुस्तक चोरापेक्षा) नीतीतज्ज्ञच जास्त पुस्तके चोरतात का?, तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक आणि त्यांचे विद्यार्थी उदार अंतःकरणाचे असतात काय?, तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक न चुकता मतदान करतात का?, तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांचे चर्चासत्रांमधील तथाकथित सभ्य वर्तन, नीतीतज्ज्ञ आईबरोबर चांगले वागतात काय?,(अहिंसा शिकविणाऱ्या) नीतीतज्ज्ञांचे मांसाहारी भोजन, नीतीतज्ज्ञ वाईट वागत असतील तर त्यांच्याकडून जगाने नीतिशास्त्र का शिकावे?, या त्यांच्या अनेक मार्मिक लेखांनी एकच खळबळ उडविली. एका अर्थाने ते 'तत्त्वज्ञानातील जागले' आहेत, असे म्हणता येईल.

पर्प्लेक्सिटीज ऑफ कॉन्शनेस (Perplexities of Consciousness), डीस्क्रायबिंग इनर एक्स्पीरियन्स? प्रपोनन्ट  मीट्स स्केप्टीक (Describing Inner Experience? Proponent Meets Skeptic) हे दोन ग्रंथ आणि शेकडो लेख त्यांनी लिहिले आहेत. The Splintered Mind हा त्यांचा ब्लॉग.

# फेसबुकच्या जमान्यात तत्त्वज्ञान !

तत्त्वज्ञानात्मकदृष्ट्या मूल्यवान काम कोणते, या विषयी अॅकेडेमिक तत्त्ववेत्त्यांनी आपली दृष्टी नेहमीच अतिशय संकुचित ठेवण्याकडे कल आढळतो. एखाद्या तत्त्ववेत्त्याच्या लेखनाला दिलेला प्रतिसाद आणि त्यातही एखाद्या विचारसरणीस वाहून घेतलेल्या गटाला दिलेली प्रतिक्रिया अशा स्वरूपाचे त्यांचे लेखन असते. प्रतिष्ठित म्हणून गणल्या जाणाऱ्या एखाद्या विशिष्ट सैद्धान्तिक नियतकालिकासाठी अमूर्त शैलीत लिहिणे, त्याकरिता जीवाचा आटापिटा करणे, त्या लेखनाचा खुबीने प्रचार-प्रसार करीत राहणे, यावरच त्यांची प्रतिष्ठा अवलंबून राहाते. बरे हे सारे उपद्व्याप तथाकथित तज्ज्ञांच्या बारकुल्या गटासाठी चाललेले असतात! हे विशेषतः विसाव्या शतकातील सर्वसामान्य चित्र आहे. आता मात्र, आपला दृष्टीकोन विस्तारणे आवश्यक आहे.



“सॉक्रेटीसचे वीरमरण”, १७८७ साली जॅक लुई डेव्हिड या चित्रकाराने चितारलेल्या मोठ्या चित्राचा मुख्य भाग. **(मूळ  लेखातील चित्र)**

---

उदाहरणार्थ, एकोणिसाव्याच्या शतकाच्या उत्तरार्धातील तत्त्वज्ञानात्मक लेखनाचा संथगतीने विकसित होणारा ऐतिहासिक आलेख पाहा किंवा अगदी अलिकडचे बोलायचे तर विसाव्या शतकाच्या मध्यकालात डोकावले तर पश्चिम युरोप आणि उत्तर अमेरिकेतली अग्रगण्य तत्त्ववेत्त्यांचे काम पाहा. एका व्यापक शैलीत आणि परिप्रेक्ष्यात या काळातील तत्त्ववेत्त्यांचे कार्य झालेले आढळते: सार्त्र, कामू आणि उनामुनो यांचे साहित्यिक लेखन आणि ज्याचे वर्गीकरण करणे अतिशय जटील जाते अशा रितीचे या तत्त्ववेत्त्यांचे शुद्ध तत्त्वज्ञानात्मक चिंतन; विटगेन्स्टाईनचे गूढ, दुर्बोध लेखनतुकडे; बर्ट्रांड रसेलचे शांतता चळवळी संबंधीचे आणि इतर लोकप्रिय सामाजिक लेखन, जॉन ड्युईचे शिक्षणविषयक पुनर्रचनेचे लेखन.

तत्त्ववेत्त्यांचे तत्त्वज्ञानेतर लोकप्रिय निबंध, कथा-कादंबरीसारखे साहित्य, त्यांच्या म्हणी-वाक्यप्रचार-वेधक सुविचार, मुलाखतीतील दीर्घ संवाद, त्यांची आत्मचरित्रात्मक चिंतने आणि त्यांचा खासगी पत्रव्यवहार यांनी एकूण तत्त्वज्ञानातच एक मूलभूत अशी ऐतिहासिकदृष्ट्या मध्यवर्ती भूमिका केली आहे. समाजरचनेशीही थेटपणे तत्त्ववेत्त्यांचा संघर्ष झाला. त्या संघर्षानेही अशीच कळीची मोठी भूमिका केली आहे: सॉक्रेटीसवरील खटला आणि त्याचे हेमलॉक विषाचा प्याला स्वीकारणे, कन्फ्युशियसची स्फूर्तीदायक काटेकोर साधुजीवन शैली.

चमच्याने दूध पाजण्यासाठीच ज्यांची नियुक्ती  करण्यात आली होती अशा १९६० आणि ७० च्या दशकातील (तत्त्ववेत्त्यांच्या) पिढीनेच खरे तर (तत्त्वज्ञानाचा लोकसंपर्क तोडण्यास) सुरुवात केली. या दशकांपासून ॲकेडेमिक तत्त्ववेत्त्यांची तत्त्वज्ञानात्मक लेखनकार्याची संकल्पना तत्त्वज्ञानाच्या तांत्रिक परिभाषेत अडकलेल्या नियतकालिकाभोवती केंद्रीत झाली आणि तिला थेट लेखनकामाठीचे स्वरूप आले.

तथापि, आज आणि आत्ता, नवमाध्यमांचा उदय लक्षात घेणे अनिवार्य आहे. दूरचित्रवाणी, व्हिडीओ ही दृक्श्राव्य माध्यमे, रेडीओ, एकमेकांना उत्तम प्रतिसाद देणारी अनुदिनी चिंतने किंवा फेसबुकवरील अनेकांचा बिनबुलाया उत्स्फूर्त सहभाग; या साऱ्यांपेक्षा ‘तांत्रिकतेच्या बंदिस्तपणात रमणाऱ्या नियतकालिकातील सारे लेख म्हणजे एकसाची घडीव बनावटीची अतिशय उत्तम तत्त्वज्ञानात्मक चिंतने आहेत’, असा विचार करण्याचे कारण काय?

सामाजिक माध्यमांमधील संवादात सुजाण सहभागीजनांनी आपला बौद्धिक कस पणाला लावून भाग घेतला तर त्या सामाजिक संवादाला उच्च दर्जाची तत्त्वज्ञानात्मक निर्मिती करण्याची क्षमता लाभते; जी एखाद्या प्रज्ञावंत तत्त्ववेत्त्याच्या क्षमतेपेक्षा कितीतरी जोमदार आणि सखोल असू शकते. उदाहरणार्थ, एखादा व्हिडिओवरील खेळ जीवनात कितीतरी कळीची कामे करू शकतो. भेदक नजर, यथार्थ श्रवण, भावनाशीलता आणि व्यक्तिगत कबुलीजबाब (का नाही?) तसेच पारंपरिक पंडिती लेखनजबाब या साऱ्यांनी समृद्ध होऊ शकेल; अशा तऱ्हेची त्यास तुल्यबल व तितकेच समान मूल्य असणारी यथार्थ जीवनदृष्टी उदयास आणणारा साक्षात्कार व्हिडिओवरील खेळ तुम्हाला देऊ शकतो. त्या जीवनदृष्टीची चिकित्सा आणि जीवनातील गम्य यांचा उलगडा होणे, हे मग ओघाने आले. व्हिडिओवरील खेळाचे हे कार्य विचारांमध्ये ताजेपणा, परिवर्तनाचे सारे सामर्थ्य यांच्याशी आणि ह्यूम, कांट किंवा नीत्शे यांच्या समग्र पारदर्शी श्रमाशी अगदी नवेच निर्मितीचे नाते जोडून तुम्हाला विश्वदर्शन देऊ शकते.

तत्त्वज्ञानात तज्ज्ञ होण्यासाठी, ही तज्ज्ञता विद्यार्थ्यांना प्रदान करण्यासाठी आणि तत्त्वज्ञानात्मक ज्ञानाचा विकास करून ही तज्ज्ञता समाजाला जमेल तशी देण्यासाठीच तर ॲकेडेमिक तत्त्ववेत्त्यांना वेतन दिले जाते. वस्तुतः कामाचे हे वर्णन व्यापक अर्थाने जीवनातील अनेक कृतींना लागू पडते.

हे पाहा, सहाध्यायी, मित्र आणि कोणत्याही तत्त्ववेत्त्यांनी लिहिलेल्या नियतकालिकातील लांबलचक लेखांना प्रतिसाद देण्यासाठी लेखन करणे आणि पुढे तशाच प्रकारचे लिहित राहणे हा चिकित्सेचा एक मार्ग आहे. पण माणसाविषयी आस्था असलेल्या कोणत्याही मुद्याची तत्त्वज्ञानात्मक चिकित्सा करता येते. केवळ नियतकालिकात उत्तम मांडणी केलेल्या कोणत्याही विषयाचा; जसे की 'विधानात्मक अभिवृत्तींची रचना', 'नैतिक तथ्यांचे स्वरूप', अशा तांत्रिकदृष्ट्या निखळ तत्त्वज्ञानात्मक विषयांचाच या मुद्द्यांच्या यादीत समावेश होतो; असे नाही. पण 'मुले कशी वाढवावीत' आणि 'खेळाडूंचा चांगला संघ कशामुळे बनतो' अशा प्रकारच्या जगण्याला थेट भिडणाऱ्या रोजच्या विषयांचा, त्यांच्या विषयीच्या चिंतनाचाही समावेश होतो.

लक्षात हे घेणे आवश्यक आहे की जगाशी नाते जोडणे, आपल्या कल्पना कृतीत रुपांतरीत करणे, ॲकेडेमिक क्षेत्राबाहेरील सामान्य लोकांच्या प्रतिसादाची दखल घेणे, आपल्या कल्पना साहित्यात आणि ध्यानात उतरविणे—अशा कृतीतून आपण आपले ज्ञान आपण केवळ उपयोजनात आणत नाही तर ते ज्ञान आपण विस्तारीतही करीत असतो, ते अधिक समृद्ध करतो आणि या कृतींद्वारे त्या ज्ञानाचा प्रसारही करीत असतो !

तत्त्वज्ञानात्मक तज्ज्ञता वैज्ञानिक तज्ज्ञतेसारखी नसते. ॲकेडेमिक तत्त्ववेत्त्यांना जरी निश्चित स्वरूपाचे साहित्य चांगलेच माहीत असले तरी सर्वसामान्य मानवी परिस्थिती आणि आपली दैनंदिन मूलभूत मूल्ये कोणती असावीत, याबाबत कर्मठ स्वरूपाच्या धर्मतत्त्वांकडून ॲकेडेमिक तत्त्ववेत्त्यांना फार काही विशेष शहाणपणाचा लाभ होतो, असे नाही. तत्त्वज्ञानात्मक संवादात बिगर-ॲकेडेमिक लोक चांगले सहप्रवासी असू शकतात आणि त्यांना तो मान दिलाच पाहिजे. विषयाला वाहिलेल्या एखाद्या नियतकालिकात निव्वळ तांत्रिक परिभाषेत लेखन करण्यावरच लक्ष केंद्रीत केल्याने बिगर ॲकेडेमिक लोक आपणाकडून वगळले जातात, हे ॲकेडेमिक तत्त्ववेत्त्यांनी लक्षात घेतले पाहिजे; किंवा खरे सांगायचे तर ॲकेडेमिक तत्त्ववेत्त्यांच्या आत्मकेंद्रीततेमुळे तत्त्वज्ञानाकडे अतिशय ताज्या नजरेने पाहात राहून वेगळा विचार देणारी ही साधी सरळ बिगर-ॲकेडेमिक मंडळी तत्त्वज्ञानात्मक चर्चेतून तत्त्ववेत्त्यांनाच वगळून टाकतात !

आज प्रसिद्ध होणारे ॲकेडेमिक नियतकालिकातील लेख त्यांची मांडणी, मुद्दे, पद्धती आणि वाचकवर्ग या दृष्टीने पहाता तत्त्ववेत्त्यांच्या ज्ञानशाखेच्या संकल्पनेनुसार गाभ्याची जागा पटकाविण्यात खूपच मर्यादित ठरतात.

संशोधनाला वाहिलेले तत्त्वज्ञानाचे (विद्यापीठ व महाविद्यालयातील) विभाग म्हणजे तेथील "प्रा. मंडळी" माध्यमात लिहिणे ही "सेवा" समजतात, जी "संशोधना'' पेक्षा कमी प्रतीची मानली जाते. 'सेवा' किंवा 'कोणतीही सेवा' कमी प्रतीची समजली जावी का (किंवा का समजली जावी), हे मला सांगता यायचे नाही, पण माध्यमातील लोकप्रिय लिखाण सुद्धा संशोधनाच्या तोडीचे मानले पाहिजे, असे मी सुचवितो.

पण इथे ताण असा आहे की माध्यमात केले जाणारे लोकप्रिय लेखन म्हणजे आधीचे कुणाचे तरी तत्त्वज्ञान उचलून 'शिळ्या कढीला ऊत आणणे' आहे, ते "तुंबडी भरणे' किंवा "पाट्या टाकण्याचे" साधन आहे, असा कुणाचा समज होत असेल आणि म्हणून ज्या बिगर-तज्ज्ञ वाचक-प्रेक्षकांसाठी असे लेखन होत आहे त्यांच्या प्रतिक्रिया गांभीर्याने घेतल्या जात नसतील तर; मग होय, हे लेखन म्हणजे खरे संशोधन नाहीच!

तथापि जर एखादा लोकप्रिय निबंध जर तत्त्वज्ञानात्मक सर्जनशीलतेचे प्रेरक स्थान बनू पहात असेल, म्हणजे ज्यात नव्या शक्यतांचे सूतोवाच होत आहे, अशा कल्पना व्यक्त होत आहेत तसेच ज्यात स्वतःचे विचार म्हणजे कुठल्यातरी कल्पनेचे केवळ पुनरावतरण नसेल, त्याचवेळी नवा विचार करण्यास (केवळ स्वतःचे मार्केटींग नव्हे) समव्यावसायिक चिंतकांना उद्युक्त करीत असेल तर असे लोकप्रिय लेखन म्हणजे एखाद्या दर्जेदार नियतकालिकातील लेखाप्रमाणे प्रत्येक निकषाच्या अंगाने 'संशोधन' मानले पाहिजे.

सरकारला सल्लामसलत देणे, चिवचिवाटास (ट्विटर) उत्तर देणे, (टेडसारख्या) व्हिडिओना प्रतिसाद देणे किंवा गेला बाजार कविता करणे, ही कृती सुद्धा 'संशोधन' या दर्जाचे असते, हे अधोरेखित होणे आवश्यक आहे.

***('लॉस एंजेलिस टाइम्स' मध्ये १९ जुलै २०१५ रोजी प्रकाशित झालेल्या एरिक श्वात्झगेबेल यांच्या 'फिलॉसॉफी व्हाया फेसबुक? व्हाय नॉट?" या लेखाचा गोषवारा)***

"Philosophy via Facebook? Why not?" By **ERIC SCHWITZGEBEL** ***http://www.latimes.com/opinion/op-ed/la-oe-0719-schwitzgebel-philosophy-articles-20150717-story.html***

- श्रीनिवास हेमाडे – तत्त्वज्ञानाचे सहयोगी प्राध्यापक, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर, अहमदनगर shriniwas.sh@gmail.com, http://shriniwashemade.yolasite.com/